म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९६८३
९६८३



# ...ध-स्मृति

REFBK-0013488
REFBK-0013488

यशवंत कोकजे · प्रभाकर कोकजे

काव्य.
३८८१३
१५.८.८
सं.२
१९२३

# गंध-स्मृति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५८९३ दि: ८/८/५८
क्रमांक १६२३ नों दि: १५/५/५८

कवि

कै. प्रभाकर नारायण कोकजे

श्री. यशवन्त नारायण कोकजे

REFBK-0013488
REFBK-0013488
९३४८८
दा. क्र.

मूल्य

दोन रुपये

प्रकाशिका : सौ. अभया यशवन्त कोकजे
**अभया प्रकाशन**
२१६, यादवगोपाळ पेठ
सातारा शहर

■ ■

चित्रकार : र. स. कंटक

■ ■

© सौ. अभया कोकजे

■ ■

प्रकाशन दिन
१५ जानेवारी १९६३

■ ■

मुद्रक : चिंतामण जोशी
**माधव प्रिं. प्रेस**
अलिबाग, जि. कुलाबा.



: अ र्प ण ...छे... त र्प ण :

## आई—ऽ ऽ ऽ

*कै. प्रभाकर दादाच्या मृत्यूची तार आली आणि स्वयंपाक करतां करतां तूं कोसळलीस तुटलेल्या वृक्षा सारखी—*

*रात्रं–दिन–एकच क्षीण घोष "माझा* **पहाडा सारखा प्रभाकर असा** *कसा गेला–"*

*आई–पुत्र प्रेमानें तूं तिळ तिळ कण् कण् हृदयीं पिळवटून गेलीस. पुत्र ! पुत्र ! ! करत तूं आपले प्राण फेकून दिलेस—*

*तुझी ती भावविवशता— तुझें तें पुत्रप्रेमाने विव्हल झालेलें हृदय— तुझी ती तगमग— ती व्याकूळता ! आई—आई— तुझ्या या वेडचा मुलाच्या हृदयींचे बोल तुझ्या आत्म्याला नको अर्पूं तर कुणाला ?*

*लहानपणीं प्रत्येक बारीक सारीक गोष्ट तुलाच नाहीं का सांगत असे—? म्हणून आये, तुलाच ही गंधस्मृति अर्पण—*

तुझें वेडें कोकरूं,

**बाळ**



# स्मृति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८०९३ वि: काव्य
क्रमांक ९८२३ नों दि २५।५।६५

–कै. प्रभाकर कोकजे.

---

आशिर्वाद तुला प्रभाकर ! दिले, आले फळाला कुठें ?
आतां काय लिहूं ? चिरंजिव म्हणूं ? हें आंतडें की तुटे !
गेली माय झणीं तुझी तुजकडे; ती भेटली का तुला ?
नाहीं पत्र खुशालिचे म्हणुनिरे ! चिंताच वाटे मला !

तुझा विरहविद्ध : **–नाना**

# प्रस्तावना :

## बालकवि कै. प्रभाकर नारायण कोकजे

एका वर्षाच्या अल्पावधींत आपल्या जातिवंत काव्यगुणांनीं आमच्या कॉलेजांतल्या महाराष्ट्रीय विद्यार्थीवर्गांत आपली छाप पाडून दिवंगत होणारा कै. प्रभाकर नारायण कोकजे याची आठवण जेव्हां जेव्हां येते तेव्हां तेव्हां मनास वाईट वाटल्याशिवाय रहात नाहीं. साताराचा हा मुलगा पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजमध्यें प्रथम वर्षाचा अभ्यास करून आमच्या कॉलेजांत गेल्या वर्षी येतो काय, मराठी वाङमयमंडळातर्फे झालेल्या लेखनस्पर्धेत उत्तम काव्य व लघुनिबंध लिहून पहिलें पारितोषिक पटकावितो काय; आणि एक महिन्यापूर्वी विषमज्वराच्या आजारास बळी पडतो काय! सर्वच विचित्र विधिघटना! उदयोन्मुख तेजोराशी निर्घृण काळाच्या उदरांत अकालीं लुप्त होतात त्या अशा!

या बालकवीनें जेव्हां आपल्या कविता मला प्रथम दाखविल्या तेव्हांच माझी खात्री झाली कीं, हा प्रतिभावान् कवि आहे. गेल्या वर्षीच्या कॉलेज नियतकालिकाच्या दोन्ही अंकांत मिळून त्याच्या एकंदर ५ कविता व १ ललितनिबंध आम्ही प्रसिद्ध केले. कोणत्याच एका विद्यार्थ्याचें इतके लिखाण यापूर्वी आमच्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालें नव्हतें. त्याच्या प्रसिद्ध झालेल्या कविता– १ ध्येयवादी. २ धूर आणि पाणी, ३ ध्रुवाकडे, ४ जग काय म्हणेल? या होत आणि प्रसिद्ध झालेल्या ललितनिबंधाचें शीर्षक 'वेडा' हें आहे. वरील साहित्यावरून कै. प्रभाकरांत स्वतंत्र प्रज्ञा, प्रतिभा, प्रसाद, वगैरे साहित्यगुण किती प्रमाणांत होते याची सहज साक्ष पटते. जिवंत भावना व आत्मप्रत्यय यांवर त्याच्या काव्याची बैठक होती. उदाहरणार्थ खालील पद्यपंक्ती पहा :—

( १ ) " ह्या हृदयाचा । ह्या शरीराचा । मी तर राजा । जगता !
दाखव । खुशाल गमजा ! "… …

—( जग काय म्हणेल ? )

( २ ) पेटतात येथें मजूरांचीं प्रेतें । धुराड्यांतुनी हा जाई धूर ।।
रम्यप्रासादांत आणि कोठें दूर । निघतसे धूर सौवर्णाचा ।।

—( धूर आणि पाणी )

जरी सर्व जातिवंत कवींप्रमाणें कै. प्रभाकर ध्येयवादी होता तरी जगांतल्या भेसूर वास्तवतेची त्यास जाणीव होती. त्याच्या इतर कविता आमच्या पाहण्यांत नाहींत परंतु ज्या आम्ही कॉलेज नियतकालिकांत प्रसिद्ध करूं शकलों त्यावरून आमची तर पक्की खातरी झाली होती कीं, हा पुढें खरा प्रतिभावान् कवि म्हणून नांव कमावील.

त्याच्या अकालीं निधनानें महाराष्ट्रांतला एक जातिवंत उदयोन्मुख बालकवि नाहींसा झाला आहे !

या कॉलेजचें मराठी वाङ्मय मंडळ या करुणघटनेंत त्याच्या आप्तमंडळींच्या दुःखांत समभागी होत आहे, हें मंडळाच्या वतीनें मी येथें नमूद करतो.

प्रा. रा. म्हा. वाघमारे

ऑक्टोबर १९४७

कार्यवाह, मराठी वाङ्मय मंडळ.
प्रतापसिंह कॉलेज, बडोदें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 3६०९3 वि: ८१०५
क्रमांक ९६२3 दि. २५।८।६८

# ध्रुवाकडे

( जाति– भूपति )

वर अनंत अंबर प्रकाश पखरण घालीं
अन् अथांग दरिया खवळे खिदळे खाली १

ही नांव लेउनी शुभ्र शिडाचा साज
डौलांत चालली, मत्त जणूं गजराज ! २

अन् विडंबिण्या त्या नौकेला हा कोण
आकाश लघुनी हंस चालला सान ? ३

उन्मत्त किती ह्या उंच रोधिती लाटा
प्रतिरोधित त्यांना सतत चालली नौका ४

लोटले कितीतरी दिवस आणखी मैल
परि नांव चालली अखंड कांपित सलील ५

पण हंस कुठें तो ? खंत कशाला आतां
हा हन्त ! बिचारा सोडुन गेला जगता ६

क्षितीजावर चमके अढळ ध्रुवाचा तारा
वेगांत चालली नांव प्राशुनी वारा ! ७

□□□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९3४८८
शाखा

# दिवाळी

मंगला दुंदुभी झडली "आजला दिवाळी आली" ॥ धृ० ॥

प्रेमला माय बंदीत–लोळते दीन नर्कांत
अत्तरे उटी चर्चून एकटा करूं का स्नान ?

शृंखला बद्ध ते हात ‘ खळखळा ’ ऐकतो नाद
घालुनी कडीं सोन्याचीं वावरूं काय लोकांत ?

फाटकें वस्त्र नेसून पाहते माऊली वाट
रेशमी आणि मी वस्त्रें लेउनी हिंडू मोदांत ?

मृत्तिकामिश्र कोंड्याची भाकरी ती मुखीं घाली
आणि स्वादिष्ट मिष्टान्नें घालुं का आपुल्या गालीं ?

तडफडे माय अंधारी, भोवतीं भासतीं भूतें
मालिका दिव्य दिपांची पाजळूं काय मी येथें ?

फड्फडा वाजती फटके ‘होय रे’ माय आक्रंदे
फटाके, चंद्रज्योती मी पेटवूं आज का येथें ?

□□□

## उल्का

स्वतंत्रता, सुसंपदा, सुसंगती अनंत ती
सुराज्य स्वर्ग सोडूनी कशास येथ धावसी ?

सुधीर तूं अधीर अन् बधीर चित्त होऊनी
कशास मोहूनी वृथा खुशाल येथ धांवसी ?

धरेस माय मानूनी सुखांत झेप टाकसी ?
परंतु येथ आपला मिळे न औषधास ही !

पतंग भस्म पावतात ज्योति प्रीत साधती
उगाच भस्म पावशील या जगांत येउनी

दुरून आद्रि साजरे सुमंत्र हा न जागसी
खचीत वेड लागले म्हणून येथ धावसी !

□□□

# कृतज्ञता

(शिखरिणी)

किती साहूं ओझें–तरल नयनीं अश्रू जमले
कसें फेडूं आतां–कळत न मला पांग अपुले
कृती साधी माझी धरूनी मुकुटीं ती मिरविली
सुगंधीं पुष्पेंहि उधळुन तुम्हीं तीवर दिली
निज स्कंधीं तुम्हीं धरुन मजला आणि फिरला
किती केला माझा, अजुन स्मरते, गौरव मला
मना होवोनी तें स्मरण तुमचें शीर नमतें—

□□□

# धूर....आणि....पाणी

पेटतात येथें मजुरांचीं प्रेतें
धुराड्यांतुनी सांडे धूर
प्रासादांत रम्य आणि कोठें दूर
निघतसे धूर सौवर्णाचा
चढे त्या धन्याच्या डोळ्यावर धूर
गर्क सदा क्रूर ऐषारामीं
लोटतसे येथें आसवांचा पूर
आक्रंदे भेसूर कोणी तरी
प्रासादांत आणि शिंपतसे कोणी
सडा रात्रंदिनीं संपत्तीचा
अतृप्त तें मन अतृप्त सर्वदा
सुटे पाणी सदा जीभेला त्या
निवारती धूम्र जलौघ ते काय
आटणार तोय धूरानें कां ?

□□□

# जग काय म्हणेल ?

ह्या हृदयाचा
ह्या शरीराचा
मी तर राजा
मी तर राजा
जगता ! दाखव
खुशाल गमजा !

मनास रुचलें
दिलास पटलें
तें तें केलें
व्यर्थ जगा ! तव
फुटले डोळे !
सुखेनैव तर
आतां वाजव
ठणठण बाजा
ठणठण बाजा !
मना वाटलें
जिभेस सुचलें
म्हणून असलें
गरळ ओकलें ?
अशी फुकाची
वाफ मुखीची

मुक्तबंध तूं
सोड परंतू

'बे बे ':असली
कुचकामाची
जाण रे अजा
जाण रे अजा
ग्रामसिंहवत्
तुझें भुंकणें
चिरकालिन मम
अनुभव जाणें
घालिन कां मग
भीक तुला मी ?
तरिहि मधें अशि
लुडबुड करूनी
भुंक भुंकुनी
स्वयें करविशी ( स्वतःच करशी )
व्यर्थ स्वतःचा
गाजावाजा !

अजाणतेपणीं
पाय घसरूनी
आणि कधि जर
सुरराज्यांतुन
आलो भूवर
तुझें खेळणें
होउन जगणें
योग्य गमे त्याहून मला कीं
मृत्यू-बाजा ! !

□ □ □

# खून !

(देवप्रिया)

काढलें सामान सारें तेथ होते तेवढें
रिक्त केले त्या अनाथांचें अभागी झोपडें
तुच्छतेने हांसुनी अन् ढाळुनी वन्ही हृदीं
चालता होई धनी तो दूर प्रासादाकडे

शोक धिंगा घालतो त्या लाडक्यांच्या अंतरीं
आणि दुःख व्याकळोनी तो बिचारा तड्फडे
त्रस्त मुद्रेनें बघे मार्तंड क्रोधें खालतीं
तप्त खालीं अन् फुफाटा पोळतोही कातडें

आटलेले कूप ओढे भीक कोणी घालिना
अन्नपाण्यावीण त्याचा अंतरात्मा तडफडे
वृक्ष पर्णावीण होते जाहलेले बोडके
आसरा घ्यावा कुठेंही राहिलें ना रोपडें

सांज होई, मेघ वाही शीत वारे गर्जती
दाट काळ्या अंतराळीं वीज कोठें कडकडे
वाटले ना वाटले जो त्या जिवांना हायसे
देवतांच्या आर्द्रतेचे सांडले खालीं घडे

येउनी अंगी उमेदी दीन मुष्टी तो वळे
न्याहळोनी 'लाडक्यांना' पाय टाकी अन् पुढें

× × ×

भासली ती क्रूर मूर्ती बैसलेली मंदिरीं
घेऊनीया कैक प्रेते दीन गाईंची पुढें

'बापुडा' झाला पुढें अन् लग्वलखेही कांहींसें
– बंद झाली हृद् क्रिया त्या राक्षसाची, तो पडे
आर्त ऐशी हाक कानीं येत जेव्हां भृत्य ते
येउनीया देखती तें सावकाराचें मढें.

× × ×

राजमार्गांतून बंदी चालला होता कुणी
उंच वाडे हांसती ते पाहुनी त्याच्याकडे
दावुनी अन् बोट कोणी बोलले त्याला 'खुनी'
स्थीर दृष्टीने बघे तो काढुनी छाती पुढें

लाडक्यांचा आर्त आला सूर कर्णीं कोठुनी
पाश भंगोनी जिवांचे चालला निश्चित तो
आणि मार्गीं श्वान कोणी हेल काढोनी रडे
तड्तडा तुडवीत भूमी त्या वधस्तंभाकडे

× × ×

भंगलें आकाश, येई गर्जना वाऱ्यावरी
मानवांची न्याय नीती आजला फाशीं चढे

□□□

## विरस किती झाला

दौत, लेखणी, बाड घेउनी मनाशींच हंसला
आणि कवीश्वर तंद्री लागुन गात तिथें बसला.
"चंद्र, चंद्रिका आणि तारका पळून त्या गेल्या
भोंवळ येऊन लता कोमला धरणीवर पडल्या
शोधशोधला परि न लागला पत्ता तो मजला

कोकीळ पक्षाचा, कोठें रुसुन अहो बसला?
गातां गातां कुठें मारली दडी निर्झरानें,
आणि कळेना तशीच कोठें मम आवेशाने
सूर्य पाखडे आग भूवरी, काव्य विषय नुरला
सुचे न कांहीं देह पूर्ण हा घामाने भिजला
खाजवुनी मस्तक शिणलो मी काव्य कसे गाऊं?
सखी लाडकी जवळ न तीहि काव्य कसे गाऊं?

प्रतिभा गेली आटुन आपुली काव्य नका गाऊं!
किटले माझे कान, पुरे तें काव्य नका गाऊं!॥
पाकघरांतुन ध्वनी उमटला, कानावर आला,
आणि बिचाऱ्या कवीश्वराचा विरस किती झाला!

□□□

## तुझ्याचसाठीं—

तुझ्याचसाठीं तन मन
तुझ्याचसाठीं सारें हें धन
तुझ्याचसाठीं माझें जीवन
तुझ्याच चरणीं केलें अर्पण

भेकड, दुर्बळ, निष्प्रभ किंवा शिव्याशाप मजला
क्रूर भोंवतीच्या जनतेने किती जरी दिधले
तरिही झेलले आणि पचविले ते जहरी प्याले
कारण होता एकच ठाऊक प्रीती मंत्र मला

* * *

परंतु जेव्हां अग्नी सडा हृदीं तुही शिंपियला
ह्या भूवरती ह्या जन्मीं मज नरकवास घडला.

□□□

# माज्या घरांत

माज्या घरांत मंगऽल मंगऽल । गऽबाई घरांत मंगऽल मंगऽल ॥धृ

गरीबाचं खोपाट
हितं कुठला थाट
झाडून लई बेस पर केलं । ग ऽ माज्या० ॥ १ ॥

जाईवाणी कवळं
माजं नेणतं बाळ
आतां खुशाल हितं लोळंल । ग ऽ माज्या० ॥ २ ॥

दीन खोपाट जरी
मर्जी तेच्याव तरी
लक्षीमिची तवाच व्होईल । ग ऽ माज्या० ॥ ३ ॥

राबूनश्यानी इरबळ
तुडवून सम्दा माळ
माज्या जिवाचं धनि येत्याल । ग ऽ माज्या ०॥ ४ ॥

येवूनशानी दारीं
बसत्याल खिनभर तरी
शीण इसरून ग्वाड हसत्याल । ग ऽ माज्या० ॥ ५ ॥

लक्क आबाळांत
सुकीर आणिक चांद
आमी तसंच खेळं खेळ । ग ऽ माज्या ॥ ६ ॥

□□

# वेडी

हा सुदिन खरी ही माया
पातला मंदिरीं राया ॥ धृ० ॥

बैसुनी रोज उद्यानीं
ही प्रिया आपुली मानी
विनवुनी चंद्र तारांना
पुसतसे वायु मेघांना
षट्पदा आणि उछ्वासा
" पाहिला कुठें कां राया ? "

झाडुनी मेज तें स्वच्छ
सजवुनी ठेवते गुच्छ
पुस्तकें लावुनी नीट
नित्य मी करीतसे थाट
चुंबुनी आणि तसबीर
विनविते ' भेट दे राया '

मांडुनी ताट नि पाट
पाहते आपुली वाट
भरभरा घेउनी घास
लागते आणि कामास
वाजुनी दार वाऱ्याने
वाटतें परतला राया

विरह तो लव न साहोनी
अंगणीं एकली बसुनी

त्या दिनीं गाईली गाणीं
हांसली तोंच फुलराणी
'शाहणी, मीं नसे वेडी'
बोलले "आज ये राया"

तेवती ज्योत ह्रदयाची
मालिका भाव सुमनांची
पुनित अन् उदक अश्रूंचें
साहित्य सज्ज पूजेचें
"तिष्ठत मी राहुं कितीरे"
चिडुन सदा वदते सखया

भासती वर्तुळें भोतीं
त्यांतुनी दिसे तव मूर्ती
पावले दर्शना तुझिया
तृप्त मी जाहले राया

बाहती तारका बघ त्या
चालली सोडुनी काया.

वाऱ्यावर कोणी गाई
दशदिशा निनादुन गेल्या

"हा सुदिन खरी ही माया
पातला मंदिरीं राया"
भेटला मला मम राया"

□□□

# मायबोलीस–

(वृत्तः--चंद्रकांत)

१

वंदन मंगल तव चरणातें महाराष्ट्रभाषे,
मायबोलि तूं अमुची आम्हीं सेवक तव खासे ?
ज्ञानेशाचे, त्या एक्याचे, समर्थ तुकयाचे,
मोरो वामन दादो विष्णू कृष्णा त्र्यंबकचे,
हरि नारायण, कृष्ण प्रभावर अन् श्रीपादाचे,
गोविंदाग्रज कविचे आम्हीं बंधु–तुझे बच्चे.
शूर वीर गे, नाहीं आम्हीं कुणि लेचेपेचे
आण वाहतो कंठाची या, सेवक तव सच्चे.

२

गिरिशिखरांच्या कोंदट कोनीं स्थान तुझें आई,
अर्धनग्न तूं–हाय !—न बघवति अम्हां लक्तरें हीं
नको नको परि भिजवूं डोळे, उजळ तुझें भाल
वीरपुत्र तव !–दावूं तुजला दिव्य उषःकाल !
तूं लतिका, तुज घालुनी पाणी दिव्यफुलें फुलवूं–
विश्वव्यापी गंधाने तव कीर्तिकळ्या फुलवूं !
अमूल्य यत्नीं, अमूल्य रत्नीं, आई, तुज नटवूं––
या देहीं, मंगले ! सुधेचें स्नान तुला घडवूं

३

पांचहि खण्डीं राज्य करितसे आंग्लांची वाणी,
हीं हृदयें परि विस्मरती कशि, तूं अमुची वाणी ?

बोध आमुच्या ध्यानीं राही बुधजनसंतांचा---
' मायबोलि हो लुप्त–अस्त हो, स्वराज्य आशेचा ! '
महत्प्रयासें–नव्हे–पणाला लावुनिया प्राणा–
विश्वराशि तुज करूं झुंजुनी हा अमुचा बाणा !
हिमगिरिशिखरीं ध्वजा फडकवूं तुझ्याच नांवाची,
हसूं नको गे, फिरवि अंगुली प्रेमळ हस्तांची.

४

मान्य भूवरी असे बहुत ती आज आंग्ल वाणी,
रसरसली मधु मकरंदाने देवांची वाणी;
तुझी माधुरी-पामर मी गे-वर्णूं तरि कैसी ?
सुधा आरती तुज ओवाळी द्राक्षा तव दासी !
ज्ञानेशाने पहा मंथुनी तुझ्या सागराला–
ग्रंथरूप मधु-सुधा आणिली या भूलोकाला
तुझ्या तुक्याची अभंगवाणी, अभंग राहियली,
दासगुरूच्या बोधाने त्या मनस्तृप्ति केली.

५

महन्मंगले, संथ शुभ्र तव ओघ तुंबलेला
गाळ उपसुनी मार्ग करोनी देऊं गे त्याला !
असंख्य सरिता मिळवूं तुझिया प्रचंड ओघाला–
अमुच्या प्रतिभेचा बनवूं गे महोदधी तुजला !
सुधा, लक्ष्मि अन् पारिजात अशी कितीतरीं रत्नें–
निर्मूं ! आम्हीं तुला मंथुनी महत्प्रयासाने !
प्रेमले ! तुला ' रत्नाकर ' मग, वदतिल जन सारे,
तुजसि कौतुकें बघतिल, आई, विश्वगोल सारे !

□□□

# विजयश्रीस

घाल गळां ह्या माळ न अथवा पर्वा त्याची अम्हा कुठें
तुझ्या प्रीतिची भक्ती करण्या वेळ अम्हांला इथें कुठें?
अवजड किती ह्या करी शृंखला मना यातना देती?
गुलामगिरीच्या ओझ्याखालीं प्राण दडपुनी हे जाती
उजाड अमुचीं सदनें पडलीं सताड उघडीं हीं शरीरें
नसूं मेंढरें मानव आम्ही चाड अमुच्या ह्रदीं उरे
फांस लागला गळ्याभोवतीं क्षुधा आंतडीं कुरतडते
प्रेमबंधनीं तुझ्या पडोनीं चाळे करूं का ते नसते?

*　　　*　　　*

नंदनवन ह्या करूं भूमिचें फिरूं पाखरें स्वैर इथें
तुला न गणता प्रयत्न करणे व्रत न अम्हा या परतें.

□□□

# वेडा

'वेडा तूं' वदती जगीं कुणी मला मिस्कीलसें हा
'ठाण्याला दवडा तयास' वदती कोणी तसे टोंचुन.
'वेडा' केवळ मी न भूवर असे 'वेडे'च जावें जिथें,
वेड्यांनी भरले असें जग, असूं 'वेडे'च आम्ही इथें
निर्माता मनुजास 'वेड' कसले लावून या भूवरी
धाडी, वेड न ध्येय तेंच आमुचें त्या खोदतो अंतरीं
'वेड्यांनी' भरलें असें जग असें त्यांचेंच इस्पितळ
'वेडा' जो न असे, खरोखर जगीं लागेल त्याला चळ

□□□

# भिक्षा

( राजा )

माझिया दारचा कुंजर सोडून
दरिद्री दारांत बांधु कां नेऊन ?
पोसशी आणून वैरण कोठून ?
उपाशी राहून जाईल मरून

अतिथी (स्वगत)

काळजी वृथा ती नको तूं करूंस
पाहीन करावें काय तें पुढती
समर्थ म्हणून मागतो मी हत्ती
खरी ही कळकळ किंवा न हो छाती ?

*   *   *

स्वतःचें उत्तर तोषवीं नृपाला
गोडशा स्वप्नांत दंग तो जाहला
" मोठा तूं दयाळू " शब्द हो हवेत
मिस्कील हास्य अन् शब्दाला दे साथ

□□□

मांडलें येथें मी ठाण!
उन्मत्तांची दाणादाण
मदांधांचें शिरकाण
करण्यास्तव माझे बाण
सोडीन मी बेगुमान

दलितांना जीवदान
देण्यास्तव बेभान
होऊन मी लवलीन
मत्तांना थोर सान

कवीला काव्याचा आधार
कवी मग कसा कुणा उरणार
विंधा कुणी रोखूनी निंदा शर
टीकेचे कोसळोत डोंगर
होवो वा अनल वृष्टी भयंकर
तिळ न परी हलणार
असूं दे स्वर्गीं वैभवशाली
जीवित कंठीत वा या भूतलीं
वास असो किंवा पाताली
काव्य सदा गाणार—

# अजिंक्य ताऱ्यावर

गडाच्या या खिंडारांत
घोंघावत झंझावत
माझिया या अंतरांत
पेटे पोत विरे रात

कोठे वाडे कोठे तख्त
भग्न अवशेष फक्त
धुत्कारती दिवाभीतें
आक्रंदती वेडी भूतें

" कोण रे तूं काय मेष ?
आला पालटून वेष
ह्रदीं पाजळला त्वेष
जाहलो ईशाचा मी ईश

रिक्त पाहून तलाव
उधाणून आले भाव

□□□

93844



# गंध

—यशवंत कोकजे

ही जीवनगीता त्या जीवनसरितांच्या
सहस्त्राश्रूंनीं पावन झाली आहे.
हेंच माझें रामेश्वर आणि....
इथेंच माझें बद्रीकेदार !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 38093 वि: काव्य
क्रमांक 9823 नों दि 25/5/58

रक्त अन् अश्रू इथें कालवे ।
चिखल जाहला त्यांचा सुंदर ॥
बनवा त्याच्या प्रतिमा आतां ।
खेळत बसण्या हांसत हांसत ॥

१९५३

# मज थरथरता अश्रू हवा

शद्ब नको, मज अर्थ नको, बेहोष मज भाव हवा
पार्थाचे साफल्य नको, मज कर्णाचे वैफल्य हवें ॥ १ ॥
ह्यू रोजाचा वेष नको, मज झांशीचा तो त्वेष हवा
चपलेचें चापल्य नको, मज मेघांचें गांभीर्य हवें ॥ २ ॥
मार्क्सीचा अर्थ नको, मज जगण्यांतिलहि अर्थ हवा
फ्राइडचा काम नको, मज मदनाचें मांगल्य हवें ॥ ३ ॥
शंतनुचा मज मोह नको, परि भीष्माचें वैराग्य हवें
योग नको, रतिभोग नको, अन् मोहाचाहि लोभ नको ॥ ४ ॥
सिंधुचा होष नको, मज गंगेचें पावित्र्य हवें
पृष्ठावरी फेन नको, मज अंतरीं अनुराग हवा ॥ ५ ॥
भीषण तें हास्य नको, मज थरथरता अश्रू हवा
शद्बांचें जाल नको, मज हृदीचा अंगार हवा ॥ ६ ॥
गाधीज मुनीचा क्षोभ नको, मज कण्वाचें वात्सल्य हवें
तुझ्या तनुचा लोभ नको मज, प्रीतिचा तो सेक हवा ॥ ७ ॥
सूर्य नको मज चंद्र नको, मातीचा मज दीप हवा
खेळ नको, मज माळ नको, रामाचा मज हट्ट हवा ॥ ८ ॥
गीत नको, मज नृत्य नको, शांत तुझा आभंग हवा
बीन नको, मज ताल नको, एकतारीचा सूर हवा ॥ ९ ॥
भाल नको, मज कचपाश नको, स्नेहस्निग्ध तव हास्य हवें
प्रेमल, मंगल, वत्सल, लोभस, थरथरता तो स्पर्श हवा ॥१०॥
स्वर्ग नको, मज नर्क नको, अंतरीं तव वास हवा
प्राप्ती नको, मज तृप्ती नको, सतत तुझा ध्यास हवा ॥११॥ □□

# सोनेरी मेघाला—

सोनेरी मेघाला
दुःखाची आज कडा
बिल्लोरी भिंगाला
एक उभा जात तडा— १

देवोनी होकारा
दूर अशी जाशी का ?
जवळी येवोनी
अंतर हें वाढत का ? २

अंतरीं अनुराग तुझ्या
बाहेरी संभ्रम कां ?
बडबडत्या जिव्हेला.
आज असें बंधन कां ? ३

खट्याळ नेत्र तुझे
गांभीर्ये नटती का ?
हरणीचें चापल्य
पाशामधीं अडके का ? ४

हास्याचा निर्झर हा
निःशब्द असा वाही का ?
स्वागत शब्दांना
खिन्न अशी झालर का ? ५

मी तुझीच रे म्हणतांना
आज अशी लाजत का ?
स्पर्शाने—श्वासाने
विव्हळ अशी बनसी का ? ६

□□□

# घराकडे

दिसूं लागली घरें समोरी
डोंगरमाथा तसा पुढें
वळणावरती वळता चाकें
मनांत माझ्या कांहीं दडे ।१।

रस्त्यावरची पिंपळ पानें
हात खुणांनी पालवती
कुळकुळीत हा काळा रस्ता
पायघडीला मागें पुढती ।२।

अवतीं भवतीं रानें हंसूनी
मला म्हणाली कधीं निघाला ?
झाडावरची चिऊ म्हणाली
'बाळ अमुचा आला आला' ।३।

समोर माझा पडका वाडा
नव्या दमानें हसूं लागला
देव घरांतील क्षीण घोष हा
कानीं माझ्या घुमूं लागला ।४।

माझे डोंगर, माझ्या सरिता
गाऊं लागलीं स्वागत गाणीं
हिरव्या कुरणीं पोर गुराखी
गावूं लागली गोड गौळणी ।५।

मोटेवरचे थांबें गाणें
उगारलेला हात राहिला
सरजा राजा, शिंग रोखूनी
पवळ्यावरती उगा गरजला । ६ ।

गाडी थांबता उड्या मारुनी
वैजा, अण्णा टाळ्या पिटतील
" यावे भाऊ, यावे भाऊ "
राघू माझा बोलूं लागेल । ७ ।

हातांमधलें काम टाकुनी
भाकर तुकडा पाणी घेऊनी
लगबग लगबग येईल आई
वात्सल्याचें वस्त्र लेवूनी । ८ ।

× × ×

छेः छेः कुठलें दृश्य अतां तें
स्वप्नच होतें एक साजिरें
पडक्या भिंती उदास शांती
आणिक भ्रांती अता उरें । ९ ।

□□□

# अभये.... !

वाऱ्यावर भरकटलो
पर्णापरी स्वैरसा
कोणती दिशा पुढें ?
चाललो कुठें कसा ॥ १ ॥

वाऱ्याला माहीत ना
ताऱ्यांना माहीत ना
क्षुद्र अशा पर्णाची
कोणाला जाणीव ना ॥ २ ॥

आज तुझ्या स्कंधावर
श्रांत क्लांत विसावलो
कुरळ्या या कचपाशीं
सहजपणें गुंतलो ॥ ३ ॥

सुकलेल्या निर्माल्या
तूंच गंध दीधला
फसलेल्या कवितेला
तूच अर्थ लावियला [। ४ ॥

भंगलेली मूर्ती तुझी
तूंच पुन्हा सांधलीस
तुटलेल्या ताराही
तूंच छान जोडिल्यास ॥ ५ ॥

उधळलेला डाव पुन्हा
तूंच नवा मांडलास

तडकलें भिंग सये
तूंच पुन्हा सांधलेंस ॥ ६ ॥

सांग सये, माहीत का
तुझी तुला मौलिकता
कस्तुरी ही नाभीमधि
मृग हिंडें सैरा वैरा ॥ ७ ॥

□□□

# पाठमोरी

पाठमोरी तुज पहात असतां
सूर्य फूलाचा आठव आला
लाजाळूचें पान लाजलें
काचोळीच्या खणांत इवलें ॥१॥

पाठमोरी तुज पहात असतां
खण काठांच्या डाव्या अंगा
गौर कांतीवर रुतला ठसला
तांब्रूस तिळाचा हा रुसवा ॥२॥

पाठमोरी तुज पहात असतां
शेलाटा तव उभार बांधा
सहज लचकला मनांत माझ्या
तुझ्या कचांतील हिरवा मरवा ॥३॥

पाठमोरी तुज पहात असतां
नितळ पोटऱ्या तांब्रूस बोटें
मनांत माझ्या उगाच सलतें
तव पदराचे शेवहि उडते ॥४॥

□□□

# वाट तुझ्या कुशलाची

वाट तुझ्या कुशलाची
पाहूं किती सांग सये
पत्र न ये, दूत न ये
विचूक तुझी साद न ये ॥१॥

दिवस सरे असा तसा
अंती ही वैरीण ये,
रात्र उभी दाराशीं
वेडावत हांसत ये ॥२॥

भास तुझा ओठांशीं
श्वास तुझा गालाशीं
तिथें तुझा हुंदका
रडे परि इथेंच मी ॥३॥

हास्य तुझें खळाळतें
अंतरीं मम फुलतें हो
तेजस्वी बिजली तूं
या मेघाला उजळीत ये ॥४॥

वेल आतां फुलते हो
गंध नवा खुलवित हो
सौंदर्य तव हंसते हो
अभया तूं निर्भय हो ॥५॥

□□□

# बाळे अनुराधे:—

माझी बाळ मला गेली । येथें एकटा टाकून
अनू बाळा सांग तुला । बाबा तुझे स्मरती नं? ॥१॥

येथें पाळणा रिकामा । जाता येता झोके देतो
बाळे तुझें रूप पाही । रिक्त पाळण्यांत कांहीं ॥२॥

अनु, अनु, हांक मारी । हुंकार न कानीं येतो
गोजिरें ना रूप दिसें । सोनुलें तें हास्य रुसें ॥३॥

एक छोटेसें अंगडें । तुझें इथें राहिलेलें
तेंच हृदयीं धरून । रूप तुझें आठविलें ॥४॥

तुम्हां माहीत का माझी । छोटी छोटीशी अनुली
माझें हरीण शावक । माझें वासरुं पाडस ॥५॥

डोळे तिचे मीन दोन । कुंतलांची मखमल
ओठ इवलेसे छान । कांहीं बाहीच बोलत ॥६॥

हास्य तिचें खळाळतें । निर्झराचें गीत गातें
योजनांचें अंतरहि । एका क्षणांत संपतें ॥७॥

माझी अनु—अनु बाळ । बाबा तुझे पुकारती
इथें तिथें बघत हा । अनुराजा हुंकारतो ॥८॥

□□□

# मी कृष्णाचें चित्र पाहिलें !

दुःखी होती राधा निजली
गंगा यमुना नयनीं भरल्या
विकल राधिका आर्त स्वरानें
कृष्णा, कृष्णा साद घालते ॥१॥

यमुना तीरीं गाई वळितां
हांक ऐकूनि व्याकूळ कान्हा
कुणी छेडिली तार अन्तरीं
तप्त सुवर्णी 'कान्हा, कान्हा' ॥२॥

राधा माझी आर्त स्वरानें
हांकारी परी जाऊं कैसा
कर्तव्यानें पाय बांधिले
मानव्यानें देव बांधिला ॥३॥

व्याकूळ राधा, व्याकूळ कान्हा,
व्याकूळ पाडस सांडी पान्हा
व्याकूळ यमुना, व्याकूळ गाई,
व्याकूळ सारें गोकुळ होई ! ॥४॥

अंतरीं होता कृष्ण सखा जो
राधे पुढती उभा राहिला
आठवणींच्या हातांनी तो
थरथरणारे आंसू पुसितो ! ॥५॥

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३३ ३८८९३ वि: काव्य
क्रमांक ९८२३ नों वि: १५।५।८०

अश्रूंनी अंधुकल्या नयनीं
राधा पाही कृष्ण सखा तो
सारी अवनी व्यापून राही
कृष्ण कन्हैया तिचा सखा तो ॥६॥

चित्र पाहूनी असलें मीहि
उगाच नकळत बावरले कीं
आवरली जी गंगा मीहि
तिलाच आतां पूर आला हो ! ॥७॥

मी कृष्णाचें चित्र पाहिलें
कृष्णाचें अन् राधेचें मी
असलें सुंदर चित्र पाहिलें
मी कृष्णाचें चित्र पाहिलें ! ॥८॥

□□□

# अन्वेषण

स्वागत तव करण्याला
आतुरता आज नसे
भंगल्या या राऊळीं
आज तुझी मूर्ती नसे
मातीची रेखाकृती
श्वासाच्या, विश्वाच्या
वितळली फुंकरीं
आज मूर्ती फोडितो
आज शोधितो तुला
निळ्याशार अंबरीं

□□□

# सरणावर आठवायाचा

होतीस तूं दूर जधीं
येऊन मम स्वप्नांत कधीं
पुसशीं तूं मम आंसूं
ओठीं फुलें छान हांसूं १

होतीस तूं राधे दूरी
भाससी तू जवळ परी
कानाशीं गुणगुणत
शद्व तुझे गात येत २

नव्हतीस तूं जवळ सये
याद तुझी हेलावत ये
विशाल अन् नील नभीं
मूर्ती तुझी हांसत ये ३

दूरच तूं होतीस जरी
ओठांचा स्पर्श तुझा
ओठीं मम मखमाली
घोटाळे गालाशीं ४

धांवत तूं येशी सये
कातरत्या सायं दिनीं
आलिंगती, गुदमरती
श्वास तुझे कुंद सये ५

आजपरि अशुभच हो
तूं सामोरी आलीस हो

जवळीक अन् दूर पळे
जवळ असून हास्य जळें ६

त्या ज्वाला ग्रासायाला
गगनाला कवळूं बघती
जळणारच कां सांग सये
स्वप्नें जीं पडलीं होती ७

तीं स्वप्नें मज पुढती
येती ग खिन्न मुखानें
ते भासहि दिव्यच सारे
ठरती कां ? गळते तारे ८

नाहीं का त्यांतील कोणी
ठरणार सये अमरत्वी
जळणार नाहीं का बन्ध
जे मर्त्य जखडी कबंध ९

हें असेंच का व्हायचें
अमराला मरणहि याचें
कृष्णाची राधा सांग
कां अशीच दुबळी ठरली ? १०

ती आली धांवत आली
सोडून पाश जरतारी
पाण्यानें घागर भरली
सांडूनि ती वेडी झाली ११

आली ती धांवत आली
कान्ह्याच्या पायीं पडली

धूळीची रक्षा गालीं
भाग्याचा सिंदूर भालीं २१

ती राधा स्वप्नीं दिसते
तो कान्हा स्वप्नीं दिसतो
त्या भासीं विरण्या सारें
मी आतां बन्ध झुगारी १३

मी बन्ध झुगारी वेडे
परी बन्ध तुला गुरफटती
ते नवबन्ध तोडण्या तुजला
कोठून ताकद यावी ? १४

मृदूबन्ध भोंतीचे तुझिया
पूर्णत्व जडाला देवो
सांवली न पडणें माझी
दृष्ट तव संसारीं १५

तूं अशीच निर्भर राही
तूं अशीच मंगल राही
परी राधा तूं कृष्णाची
कधीं कधींहि न होई १६

होशील तूं सीता जेव्हां
सोसण्या शिव्या शाप तेव्हां
घेऊन ये हृदय कठोर
जें अग्नींतहि राही स्थीर १७

अन् माझ्यासाठीं राधे
माऊली पाहते वाट

माझ्यासाठीं थबके
सागर जाण्या आंत १८

माझ्यासाठीं सविता
रश्मीचा पेटवी पलिता
माझ्यासाठींच तारा
वाहे वेडा सागर वारा १९

माझ्यासाठींच सारी
सारी दीन दरिद्री
माझ्या विश्रांतीस्तव
पसरें भूमी खालीं २०

या धूळींत मंगल कालीं
विश्रांति घेणें आहे
मातीचा मी पुत्र
स्वर्गावर स्वारी करितो २१

परि जाण्याआधीं सखये
ये समोर पसरून बाहो
विरघळूं दे तुझिया ओठीं
मम स्वप्नांची साखर गोडी २२

हा स्पर्श तुझा शेवटचा
हातांचा, श्वासांचा, ओठांचा
सरणावर आठवायाचा
हा एकच क्षण दिव्यत्त्वाचा २३

□ □□

# सावित्रीचा टिळा कपाळीं

रस्त्यांतुनी मी हिंडत असतां
राजपथांतुनी दत्त मंदिरीं
उद्यानांतून चित्र मंदिरीं
कित्येक दिसती मला कुमारी ॥१॥

शालीनतेचा घेऊन बुरखा
नजर शोधिते 'हार्ट' स्पदंनीं
त्या नजरेंतून नाहीं हिंमत
लढण्याची वा करण्या गंमत ॥२॥

त्या नजरेंतून कारुण्याचें,
तारुण्याचें जहरी इंधन
उघडें दर्शन बुभुक्षितेचें
शरीराचें अन् झिजतें चंदन ॥३॥

दारिद्र्याशीं टक्कर देतां
सौभाग्याचा कुठला पत्ता ?
झांकायाला चिरगुट कुठलें ?
लजवंतीला लाज कशाची ? ॥४॥

लाजायाचे, शरमायाचें
अनोळखी हे शद्ब दुधारी
लाजेनेहि लाज सोडिली
शरमेनें तशी शरम सांडिली ॥५॥

देवदर्शनीं सभामंडपीं
मत्त स्पर्श हो कुणा कहाली
म्हणून सारी दाटी वाटी
कुणी करावी जरा धीटाई ॥६॥

असलें होतें उघडें दर्शन
आज जगाचें जेथें तेथें
लढण्याची ती नाहीं हिंमत
मरण्याचीहि नाहीं मूर्वत ॥७॥

चिखला मधले प्राणी जगती
जगहि अमुचें मंगल म्हणती
कितेक रांडा इथें मिरविती
सावित्रीचा टिळा कपाळीं ॥८॥

□□□

# मी

बेहोष मी उन्मत्त मी
गजराज मी स्थंडील मी
थयथया नाचत मी
रूंडमाळ थबथबा
रुद्र मी भैरव मी
स्फुल्लींग मी तेज मी
मीच विश्व निर्मिलें
संहारीन मीच ते

□□□

# अवशेष

स्वप्नांनीं सायंतनी
प्राचीच्या अंगणीं
उभारिलें तें सुंदर
मीनार नील नभीं

पूर्वा उजळीत सविता
घालीत घाव शिरीं
भवतालीं पडती अन्
फुटलेले चार चिरे—

शेवटचा आज दिन
आतुरता आणि सले
कांपत हे ओठ अलग थरथरते
ओठ विलग, देह फुले

□□□

# गंध

जाणारच आज सये
टाकुनी तव बंध मृदु
मत्त नवा गंध ये
आज कुठूनी हांक दे !
गंधाचा वेडा मी
बेहोष अन् धांवतसे
गंधाच्या मार्गीं नव

□□□

# आज तुझी याद पुन्हां !

आज तुझी याद पुन्हां
नकळत कोठुनि आली ?
शिरशिरत शिशिराच्या
काकडत्या रातीपरी ॥१॥

बर्फाच्या अंगुलीचा
स्पर्श तिचा जाणवतो
आक्रोशत आंत कुणी
एकला ! मी एकला ! ! ॥२॥

अशीच तूं भेटलीस
पांखर अन् घातलीस
रेशमी तुझी तनू
आलिंगत पुन्हां जणूं ॥३॥

याद अशी आज पुन्हां
केतकीच्या गंधासम
शिरशिरीत शिशिरापरी
तंत्रीच्या स्पर्शासम ॥४॥

□□□

# खुळी

वाजें पाऊल जिन्यांत
कंप उठतो अंतरीं
तीच साजिरी पाऊलें
संथ जिना चढतात ॥१॥

जाळ चुलींत सारून
घाई घाईनें ऊठले
माखल्या ग हातांनीच
जशी तशीच धांवले ॥२॥

तोंच शद्ब झंकारले
धन्य धन्य मी जाहले
कशी जाऊं मी सामोरी ?
अशी वेडावे बावरी ॥३॥

प्रकाशाचा तीव्र झोत
त्यांची आकृति उजळे
कोण पाठीं लपलेले
"बाई, भाऊजी धाकले!" ॥४॥

इवलिशी मूर्त त्यांची
गालीं मिस्कील हांसली
निळ्याशार नयनांत
फुलें चांदणें मनांत ॥५॥

दाटे उरांत आनंद
शद्ब घोटाळे ओठाशीं

पाणी उभें पापणीशीं
सारा आनंद ! आनंद !! ॥६॥

विसरलें सारें कांहीं
डोळा देखतां ती मूर्ती
पुढें खट्याळ भावोजी
उगा उगाच हांसती ॥७॥

मनीं कोंदला आनंद
शद्ब राहिले उरांत
भात करपे चुलीशीं
शुद्ध बुद्ध सरली ग ! ॥८॥

" बरें जातो आतां आम्हीं "
हळूं म्हणाले भावोजी
" जप तुझ्या प्रकृतीला
माझ्या लाडक्या वहिनी " ॥९॥

चन्द्र गेले ढगाआड
गेले छोटेसे भाऊजी
अग बाई, विसरलें
चहा देण्याचं देखील ! ॥१०॥

● १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यांतील क्रांतिकारकाच्या जीवनांतील हा एक नाजूक क्षण !

**स्थळ**– प्रीति संगम.

दु:खानें पोळणारी वहिनी अकस्मात् सुखानें गुदमरली.... आणि डोळ्यांतल्या आंसवांसह तशीच चित्रासारखी स्थिर झाली ! धन्य ती वहिनी ! (दुसरं काय !)

# मकर संक्रांत

चक्राभवतीं...रात्रंदिन
फिरते ज्यांचें नशीब....

फाळाला अन् नांगरटीच्या
विटके ज्यांचें असते दैवत

घाम गाळला त्या पात्यांतून, त्या दात्यांतून
त्या घामाचा, त्या रक्ताचा
घडीला आम्ही टपोर हलवा

रक्ताचा हा रंगीत हलवा
तिळगुळ घ्या अन् गोड बोला

□□□

# झेप

पंखाच्या सामर्थ्ये
हिंडलो नील नभीं
लंघील्या दरी, नद्या
उभार तसें शृंगहि

पवनाच्या आंदोली
बागडलो स्वैरसा
शोधाया शुक्राला
कापले नभा नभा

विश्रांतीस्तव आणि आतां
परतती तुझ्या घरा

□□□

# भक्ति

आलीस तूं अर्पाया
धांवत अन् आज सये
घेऊन हातीं तुझिया
भक्तिचीं नील दळें

आलीस तूं छेडाया
वीणेवर सूर नवे
हाय सये आज परी
तंत्रीची तार तुटे

आलीस तूं पुजाया
प्रीतिचा मूर्ती पुन्हां
हाय सये आज परि
भग्न असे देव्हारा

पदरव ये दारीं मम
कंकण ध्वनी धूंद हो
छेडीत ती तप्त तार
आर्त तुझा येई स्वर

पडलेल्या पायदळीं
धुळींत घे विश्रांति
व्यक्तांतूनी अव्यक्त असे
शोधीतसे अवकाशीं

□□□

# आठवाचा गांव

कधीं होतो मी लहान
आज आठव अंधूक
एक पाखरूं चुकार
मागें झेपावें अधीर ॥१॥

इवलेसें जग होतें
होते सोबती संगती
होता रुबाब न्याराच
सारे साखरेचे घांस ॥२॥

सारें होतें राज्य माझें
आणि आहे का माहीत
रात्रंदिस मागें पुढीं
तेव्हां माझी आई होती ॥३॥

साय साखरेचा हट्ट
तेव्हां बाळ करायचा
"साय खाऊं नये बाळा"
आई आम्हां म्हणायची ॥४॥

"साय खाणाराची आई
जाते स्वर्गीं लवकर"
"आई नको मला साय"
मला हवी माझी माय" ॥५॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 3८०93 वि: काव्य .
क्रमांक 9८23 नों दि: ९५/८

गेलें बाळपण आतां
गेली देवाघरीं माता
आज कधीं साय घेतां
दाटतसे ऊर भाता ॥६॥

आतां साईची न हांव
चाले आर्त धडपड
क्षणभर आठवावा
धुक्यांमध्यें दुजा गांव ॥७॥

त्याच आठवाच्या गांवीं
चांदोबाचा वाडा आहे
निंबोणिच्या झाडा मागें
तारकांचें छत आहे ॥८॥

तेथ म्हातारी दळते
ढगांचेंच शुभ्र पीठ
गौतमाची गाय देते
दूध गोड कांठोकांठ ॥९॥

त्याच वाड्यामध्यें चाले
माझी अंगत पंगत
आई हंसून वाढते
साईसह दूध तेथ ॥१०॥

□□□

# सर्व जगानें

सर्व जगानें उसाट म्हटले
आणि हाणिले दगड दुधारी
म्हणून आलो तुझ्याच दारीं
जखम उरीची जपत विखारी ॥१॥

मैलामागून मैल तुडविले
अस्थिंचा हा कलश घेऊनी
तुझ्या स्नेहमय गंगेमाजीं
गमें मिळावी यांना शांती ॥२॥

थबथबत्या या जखमा घेऊन
आशांचें अन् तसें कलेवर
तुझ्या प्रेममय मंगल स्पर्शें
त्यांना यावें नवसंजीवन ॥३॥

तव करुणेचें कवच लेवूनी
तव हास्याचें नव वज्र घेऊनी
मानव्याचा मंत्र जपावा
हर हर पुन्हां याच संगरीं ॥४॥

शङ्ख तुझे अन् घ्यावें हातीं
चक्र सुदर्शन दंभावरती
शक्तिमय तव हुंकारानें
चळचळ चळती अवघीं भुवनें ॥५॥

म्हणून आलो तुझ्याच दारीं
जखम उरीची जपत विखारी
परंतु सखया तूंच लाविलें
दार तुझेंहि तूंच रोखिलें ॥६॥

वसंत येईल नव आशांचा
फुले ओंडका वटवृक्षाचा
हेमन्ता तव उपहासानें
उरांत थिजलीं सगळीं गानें ॥७॥

□□□

## संकट

वादळ ये मत्त नवें
फाडण्यास शीड उभें
शीडाविन तारूं हें
पुढें पुढेंच जायचें

ठाऊक ना त्यास कधीं
कधीं कुठेंच रोधणें
एक दिनीं आणि सरे
निःस्तब्ध तें होईल रे
जलधीच्या उदरीं श्रांत
व्हावयाचें तें विश्रांत

□□□

# रोज

रोज पहातो तुजला
रोज दर्शन नवीन
रोज फुलतो आरक्त
देवा दारीचा प्राजक्त ॥१॥

रोज त्याचा गंध नवा
रोज त्याचें नवें रूप
रोज त्याचा स्पर्श मृदू
रोज ओले दंव बिन्दू ॥२॥

तुझ्या दर्शना आतूर
रोज मीहि 'वेडी पोर'
खुळा खुळाच हिंडत
निळयाशार क्षितीजांत ॥३॥

तुझ्या हास्यामध्यें एका
पूर्ण विरली चन्द्रिका
तुझ्या नयनांत निळ्या
नाच नाचती मासोळ्या ॥४॥

तुझ्या डाळिंबी चंद्राला
नको दृष्ट लागायला
एक तिटीचा टिकला
कुणी हनूस टेकला ॥५॥

तुझ्या शेलाट्या बांध्यांत
होतें दर्शन आगळें
तुझ्या उत्फुल्ल बोलांत
तप्त तार झंकारत ॥६॥

तुझ्या श्वासांत उधळे
गंध गुलाब पाण्याचा
तुझ्या ओठीं स्मित रेखा
नभीं धवल विशाखा ॥७॥

दा. क. 93488

नको खेचूस कमान
नको पाजळूस तीर
तुझ्या शराघाता आधीं
झालें सावज कातर ॥८॥

□□□

# तूं

आलीस तूं सामोरी
नयनीं जें हास्य फुलें
ओठीं तें विलग जरा
गेलीस तूं समीरापरि

हास्य तुझें रेंगाळें
वाऱ्यावर पर्ण गळें

□□□

# शत्रू हाणती

शत्रु हाणती
मित्र हाणती
शत्रु, मित्र एक साथ शद्ब वेधती
वर्म शोधती ।१।

" दुष्ट हा किती !
क्रुर हा किती ! "
दुष्ट, नष्ट, क्रुर, क्रूद्ध नाद घूमतो
ऊर फोडतो ।२।

" कलंक होय हा
कुपुत्र होय हा "
कुल, शील, नांव, गांव या न ठेविले !
या न राखिले ! ।३।

" हा न आमुचा
हा न तुमचा "
येथ, तेथ, जात, पात ही न आमुची
जात कोठची ? ।४।

" कलंक होय मी
कुपुत्र होय मी
दुष्ट, क्रूर, जात, पात हीच आमुची
जात येथची " ।५।

"मी न एकटा
मी न धाकटा
काळ,[१] जाळ,[२] भाळ,[३] टाळ[४] गर्जती पुन्हां
सांगती तुम्हां" ।६।

अग्नीमाजीं या
जो न पोळला
तो न आद्य, शुद्ध, बौद्ध, सिद्ध जाहला
मुक्त जाहला ।७।

तेंच व्हावया
तेंच गावया
मत्त, वित्त, दत्त, चित्त आम्हीं अर्पिलें
सर्व तर्पिलें ।८।

१ ज्ञानेश्वर २ सीता ३ येशू ४ तुकाराम

# वाढदिवस

वर्षाची लहर नवी
सोनेरी येत उषा
हांसत मी दारीं उभा
करण्याला स्वागत तव

वर्षांच्या राशी जुन्या
स्मृतीच्या रक्षेंत उभ्या
स्नेहाच्या फुलती किती
मज भोंवतीं रोज लता

तुटलेल्या राशी किती
पर्णांच्या पायदळीं

# बहीण

आली आली कृष्णाबाई
भेटायाला पहाडाला
एका सह्याद्रिचीं बाळें
आज भेटा लडीवाळे १

माझी बहीण प्रेमळ
दुजे मांगल्य राऊळ
धूप जळितो राऊळीं
वरी तोषली माउली २

एक उघडा खडक
उभा होता खिन्नमुख
उन्ह ज्वाळा जाळतात
वारा, वर्षा झोडतात ३

ऊन वाऱ्याच्या मारानें
जागोजाग तडकला
धूळ वाऱ्याच्या वेगानें
जागोजाग करपला ४

आज आकाशीची गंगा
धारोधार वरसली
स्नेह धारांत न्हाऊन
त्याची प्रतिभा खुलली ५

वठलेलें खोड आज
पुन्हां एकदां बहरें

सुकलेला झरा आज
पुन्हां एकदां पाझरे ६

प्राजक्ताचें झाड कुणीं
जोराजोरानें हलवी
सुम शीत स्पर्श साधा
आज अंतर सुखवी ७

□□□

# ध्येयवादी

(सुनीत)

सारें विश्व निजें तमांत विरल्या साऱ्या परी तारका
अभ्रीं खिन्न मुखें सुरम्य लपवी दाही दिशा आपुली
वाहे वादळ वात कड्कडा विद्युत अन् सारखी
भोंतीचें विश्व क्षणांत उजळें तेजःकडा एकली ॥१॥

कोठें धूक रडें अशुभ थरके ओसांडतें अंतर
कोठें श्वान रडें मधेंच चरके वेडेच तें अंतर
कोठें शांती? तुला सुरा सुरवरा प्राशावया धावली
तिचें भैरव तांडव नृत्य आतां ऐसेच चालायचें ॥२॥

जायाचें तुडवीत रात्र असली आम्हांस वेडीपिशी
जायाचें तुडवीत आज तुजला इच्छेस त्या पाशवी
हातीं हात धरून टाक चल ये वेडी खुळी पाऊलें
आशेचें स्वरगीत आज मजला कांहींतरी गाऊं दे ॥३॥

शद्बांनो मम कोसळा सरसरा आतां करा रे त्वरा
माझे विश्वच उंच उंच करूं दे उत्तुंग त्याची प्रभा ॥४॥

□ □

# याच भूमीवर

याच भूमीवर कधीं एकदा
वैराग्याचा वाही वारा
त्या वाऱ्याच्या वेगावरती
डुले, तरारे झेंडा भगवा ॥१॥

याच भूमीवर रणें जाहलीं
शब्दांचीं अन् शस्त्रांचींहि
साम्राज्याची मेढ रोविली
याच गडावर समर्थ हस्तीं ॥२॥

याच गडाच्या दगडी भिंती
निनादल्या अन् जाग्या झाल्या
हर हर गर्जी—हरी हराच्या
भैरव, भीषण, भयाण, भेसूर ॥३॥

याच गडावर शिव प्रभूची
पदधुल झडली पुण्य प्रतापी
मराठमोळ्या पुण्याईची
पेठ उघडली इथें सर्वदा ॥४॥

दिवस रात्रींच्या प्रचंड वातें
काळाचीं अन् पानें पिसलीं
आज गडावर भोंदु फिरती
पोट जाळण्या कितेक गरती ॥५॥

दाढी आहे, छाटी आहे
आहे लेपन, आहे मार्जन,

कुबडी आहे, आहे पुजा
व्याज राहिलें–गेलें मुद्दल ॥६॥

ज्यांना नाहीं थारा जगतीं
लढण्याची वा नाहीं हिम्मत
जमले येथें ऐदी पामर
भोगाला त्यागाची झालर ॥७॥

□□□

# आवाहन

मित्रांनो, आतां या
स्थंडील हे थंड हो
धगधगता अग्नि अतां
राखे मधीं बद्ध हो

फुंकरूं नका अतां
पेटतां पुन्हां कदा
ग्रासाया विश्वाला
कवळतील या शिखा

भ्याडांनो, आतां गा
बेहोष अन् बेछूट व्हा
गृध्रांनो, जंबूक हो,
व्याघ्र मृत्तिकेंत हा

हबकूं नका थबकूं नका
शांत ह्या कलेवरा
श्रांत या महीश्वरा
भक्षण्या आक्रोश करा
मेलेले जरी व्याघ्रमांस
पचेल कैसे रे तुम्हांस

□□□

# कोळयाचें जाळें

कौलाराच्या गवाक्षांतुनी
रवि किरणांचे पंख लेवूनी
हंसत हंसत आल्या भूवनीं
स्वर्लोकीच्या सौंदर्यखनी

येऊनी त्यांनीं गंधा उधळूनी
मोर पिसासम मृदु स्पर्शांनीं
नेत्र चुंबिले दिव्य स्वरांनीं
जागृती आली कलाकलांनी

हातामध्यें हात घालूनी
नाचतनाचत गेलो तिथूनी
तप्त सुवर्णी समोर धरणी
भ्रम्हयाची ही पहाट करणी

पर्णकुटी समोर माझ्या
फुलली होती सृष्टी आगळी
गुलाब, जाई, जुई, मोगरा,
सूर्य फुलासह हंसली सगळी

आणिक तेथें राजपथावर
कुणी उभविला मिनार सुंदर
चंद्रकरांचे खांब सभोंतीं
इंद्रधनुचें कुंपण भवतीं

गर्द पोपटी पर्णांमधूनी
कळस तयाचे लखलख करती

इथें तिथें अन् रत्नें जडलीं
नील मण्यांची कोनोकोनीं

मोत्याच्या या उभ्या झालरी
दाहीदिशांना चमचम करती
सूर्यफुलाचा मंडप वरती
स्फटिक धवल ही तुषार ज्योती

## भाग्यलक्ष्मी

अळुमाळ पाऊलें दारीं घुटमळलेलीं
मी पाहिली सानुली छाया तप्त सुवर्णी
ती पितृपदानें भाग्य लक्ष्मी आली
सौभाग्यकांक्षिणी राधा कृष्ण पदीची ॥१॥

मातृत्व आजला आलें माझ्या दारीं
वात्सल्य दाटलें आकाश गुदमरें वरती
श्रावण झरीं त्या क्षणांत झर झर झरती
शिंपल्यांत तरारे मोती शुभ्र रुपेरी ॥२॥

रात्र पौर्णिमा आज नारळी झुलती
तो चन्द्र सुवर्णी दिवसा येथें उगवे ?
अन् खिन्न मुखीं तो चिन्ता ढग कसला
साजिरा ओघळे मग शिंपेंतून मोती ॥३॥

ती भाग्यलक्ष्मी आली आणिक गेली
गेली ? छेः मी अवमान तियेचा केला
तो घोट विषाचा गळीं घेऊनी गेली
ती भाग्यलक्ष्मी आली आणिक गेली

× × ×

जातांना अन् भाग्यहि माझें तिच्या सवे गेलें ॥४॥

# तारा तुटला ! तुटला तारा !

तुटला तारा
तुटला तारा
अशुभ घडे । जातील तडे
कुठें तरी

तुटता तारा
तेज पिसारा
उजळी नभा । पेटती प्रभा
कुठेतरी
तुटता तारा
सुरीं आर्तता
भरे पोकळीं
गळे पाकळीं
कुठें तरी

तुटोत बंध
जळो कबंध
गातील ज्वाला
तुझ्या गीताला
कुठें तरी

वाऱ्याच्या झोक्यावर बसुनी
कुणी अप्सरा गाणें गाती
गातां गातां झोके देती
राजासह ते मिनार झुलती

□□□

# लोकमान्य

नाहीं देखली मी मुर्ती
नाहीं ऐकला तो स्वर
नाहीं हिंडलो गर्जत
तुझ्या नांवाचा गजर ॥१॥

सह्याद्रिचा उभा कडा
ताठ उन्हा पावसांत
शिवबाच्या भवानीचें
पाणी तुझ्या नजरेंत ॥२॥

कृष्णा, गोदेचें पावित्र्य
तुझ्या चारित्र्यें वाढलें
तुझा आठव घेतांना
शब्द गोठले गोठले ॥३॥

तुझ्या गर्जनेनें सारे
सात समुद्र कापले
तुझ्या लेखणीची धार
दंभ चिरे आरपार ॥४॥

शत शरदांचा शर
सोसाट्यानें आला गेला
पानोपानीं इतिहासीं
थोडा हिशेब चुकला ॥५॥

□□□

# तुझें हृद्गत राहील

फारा दिसांनी दिसली
तुझी श्यामल आकृती
फारा दिसांनी पाहिली
लता स्नेहानें लवली ॥ ॥१॥

तुझे नयन भरलें
आसूं हांसू एक झालें
तुझ्या मोगरी फुलल्या
जाई जुई ग हांसल्या ॥ ॥२॥

किती संकोच, विनय !
शब्द ओठीच लाजती
मला पाहण्या आतूर
नेत्र श्यामल, चंचल ॥३॥

पहा पहा वेडे पोरी
फार दिसांनी भेटसी
एका नयन भेटींत
काय अंतर शोधसी ? ॥४॥

उगा बावरी भांबावे
तुझे भाव तुला ठावे
कधीं केव्हां विकसेल
चन्द्र विकासी कमल ? ॥५॥

कुणी नाहीं आजु बाजू
सारा एकांत तुझाच
बोल वेडे आतां तरी
काय भरारे अंतरीं ? ॥६॥

नख पायाचें न्याहाळी
तुझी लाजरी नजर
ओठीं शब्द घोटाळती
मागें लाजून पळती ॥ ॥७॥

घडी जाणारी जाईल
तुझें हृद्गत राहील
पुन्हां दुरावूं आपण
बोल, तुला माझी आण ॥ ॥८॥

हातीं बांगड्या सोन्याच्या
मागें पुढें सरकती
त्यांच्यावर लागलेली
दृष्टी लाजून उचली ॥ ॥९॥

पुन्हां बावरे बुबुळ
गालीं लाली अवखळ
हांसू लाजत उमटें
पापणीचे पंख मिटे ॥ ॥१०॥

किती काळ थांबूं असा ?
तुझ्या ( ओठीचें ) पोटांत
वरीं येईना मनींची
भाव गंगा राही सुप्त ॥११॥

उभी दाराशीं संचीत
जातो परत येण्यास
केव्हां, कधीं, कुठें, काय ?
माझें मला न माहित ॥१२॥

□□□

## सारंग

तुझ्या विभ्रमें मी भ्रमें रागिणी गे
तुझें स्मित माझ्या फुलें अंतरीं
तुझी खिन्नता व्याकुळीं चित्त वेडे
तुझ्या दुःख खेदे सले अंतरीं ॥१॥

किती काळ एकत्र राहूं सये मी
कितीदां करूं आर्जवें रागिणी
तुझें डोळुलें सांगती प्रेम गीति
निनादें ध्वनी मी मग्न पारायणीं ॥२॥

कधीं राहिला सांग सारंग बंदी
तसा धूमकेतु आकाश पंथीं
नभीं हिंडतो मी अनंती प्रवासी
शोधी परि स्वातीचे सान मोती ॥३॥

तुझें ध्यान संपे तुझें रुप भंगे
मघा चालला घोष ब्रह्माण्ड लोपे
समुद्रीं आतां वादळीं वात लोळे
गिरीशीं आतां तांडवी नृत्य रंगे ॥४॥

□□□

# माझ्या पंढरीच्या राया

मज क्षेम द्याया जरी आसावल्या बाह्या ।
वाट पाही विटेवरी माझ्या पंढरीच्या राया ॥

तुझ्या नामाचा गजर केला मी सारखा ।
आतां घोषांत तल्लीन धुंद देहासी पारखा ॥

शुद्ध हरपे देहाची मिटले नयन ।
रोमरोमीं भरलें रे तुझेंची चिन्तन ॥

मज क्षेम द्याया जरी आसावल्या बाह्या ।
वाट पाही विटेवरी माझ्या पंढरीच्या राया ॥

झाला उशीर तुला का गुंतलास कोठें ? ।
आतां अभंग रंगला माझा देव मला भेटे ॥

मज क्षेम द्याया जरी आसावल्या बाह्या ।
वाट पाही विटेवरी माझ्या पंढरीच्या राया ॥

चिन्तनांत तुझी मूर्त साजरी गोजरी ।
पुढें हांसत नाचत उभी माझ्या रे सामोरी ॥

तुझें रंगविलें रुप माझ्या मी रंगांचें ।
नको करूंस उध्वस्त स्वप्न तें मनींचें ॥

मज क्षेम द्याया जरी आसावल्या बाह्या ।
वाट पाही विटेवरी माझ्या पंढरीच्या राया ॥

□□□

# सह्यगिरी तूं धाव

हिमालयावर संकट आलें, सह्यगिरी तूं धांव
कैलासावर तांडव चाले—माय भवानी धांव ॥
रक्त सांडतें तव पुत्रांचें स्वस्थ कशी जगदंबे ?
हातीं घेवूनी खड्ग् त्रिशूळा असूरावरती धांव

हे विंध्यगिरी, हे द्रोणगिरी
हे पश्चिम सागर पूर्व दधी ॥१॥

हिमालयावर संकट आलें भारत पुत्रा धांव
रक्त ओघळें शुभ्र हिमावर, घेऊं त्याचा सूड
पवित्र आमचें 'मानस' तेथें त्यास लागली चूड
मित्रत्वाचा बुरखा घेऊनी, शत्रू लांडगा आला
हाणून त्याला हिमालयाच्या पल्याड फेका धूड

हे मराठ वीरा—हे आंध्र गिरा
हे वंग पुत्र—हे वीर भद्र ॥२॥

हिमालयावर संकट आलें गुरु गोविंदा धांव
शपथ तुम्हांला शिवरायाची हटाल जर मागें
प्रताप, नानक, बाजी, झांशी बघतील कीं रागें
धनुर्धरांचा टणःकार तो तुम्हांस देईल चेव
मृत आईचें दूध न प्याला व्याघ्र पुत्र व्हा जागे

हे गंगे– गोदे– कृष्णे– यमूने
हे कावेरी– हे सरस्वती ॥३॥

हिमालयावर संकट आलें हे षोण नदी तूं धांव
गर्जत गर्जत फुलवित फुलवित जल तुमचें उसळूं द्या
जीवन तुमचें पुलकित गात्रें, सारीं हृदयें घुसळूं द्या
हे मातांनो, हे तातांनो रक्त हृदीचें खवळूं द्या
क्षूद्र जिवाचा त्याग करोनी सत्व आमुचें रक्षूं द्या

हे शेतकरी– हे कामकरी
हे वारकरी– हे धारकरी ॥४॥

हिमालयावर संकट आलें दूर्ग नंदिनी धांव
हर हर गर्जत सैन्य आमुचें असेच जावो पुढें
सहस्त्र पडती– रक्त सांडती परंतु पाऊल पुढें
छाती वरती जखमा साऱ्या पाठीवरती नव्हे
निशाण काठीं अमुच्या हातीं “ बच जाये तो और लढें ”

हे बालांनो, हे वृद्धांनो,
हे आयांनो, हे मायांनो

हिमालयावर संकट आलें असशील तेथूनी धांव ॥५॥

# अशीच होती....

अशीच होती रात्र सुवर्णी
अशीच होती कडे कपारी
अशीच होती रान पालवी
अंगाखालीं दमट अधीरी ॥१॥

असाच होता वहात वारा
चांदहि होता असाच गहिरा
नक्षत्रांचा असाच सारा
फुलला होता नभीं पिसारा ॥२॥

अशीच होती ओढ अंतरीं
हाय, परंतु आज साजणी
तुझ्या करांचा, तव ओठांचा
भासहि अधरीं उरला नाहीं ॥३॥

□□□

REFBK-0013488
REFBK-0013488
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ....३६६९३.... दि: ....
क्रमांक ....
मराठी ग्रंथ संग्रहालय
९३४८८
दा. क्र.